RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक ३२(५)] गुरुवार, डिसेंबर २६, २०१९/पौष ५, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.**– महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . . . . . . . | १-२ |

दिनांक २५ डिसेंबर २०१९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक २६ डिसेंबर २०१९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९६६ चा महा. ४१.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १६ सप्टेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१९, हा प्रख्यापित केला होता ;

२०१९ चा महा. अध्या. २४.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०१९, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक १६ सप्टेंबर २०१९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.



Scanned with Ca

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४८ च्या पोट-कलम (८) मधील, खंड (१) मध्ये, "तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा " हा मजकूर वगळण्यात येईल. १९६६ चा महा. ४१.

सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २४ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१९, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१९ चा महा. अध्या. २४.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त संहितेच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या उक्त संहितेच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

Scanned with Ca

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक ४९(५) गुरुवार, डिसेंबर २६, २०१९/पौष ५, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

**असाधारण क्रमांक १०४**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Act, 2019 (Mah. Act No. XXXIV of 2019), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXXIV OF 2019.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 26th December 2019).*

An Act further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.

WHEREAS, both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS, the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes hereinafter appearing; and therefore, promulgated the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2019 on the 16th September 2019 ;

Mah. XLI of 1966.

Mah. Ord. XXIV of 2019.

AND WHEREAS, it is expedient to replace the said Ordinance, by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Seventieth Year of the republic of India as follows :—



Scanned with Ca

Short title and commencement. **1.** *(1)* This Act may be called the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Act, 2019.

*(2)* It shall be deemed to have come into force on the16th September 2019.

Amendment of section 48 of Mah. XLI of 1966. **2.** In section 48 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as " the said Code ") in sub-section (*8*), in clause (*1*), the words "not below the rank of Tahsildar" shall be deleted. Mah. XLI of 1966.

Repeal of Mah. Ord. XXIV of 2019 and saving. **3.** (*1*) The Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2019, is hereby repealed. Mah. Ord. XXIV of 2019.

*(2)* Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provisions of the said Code, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or, as the case may be, issued under the corresponding provisions of the said Code, as amended by this Act.

Scanned with Ca